जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Times of India 26 JUN 2016

# Fadnavis to inaugurate virtual classroom at university today

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Chief minister Devendra Fadnavis and school education minister Vinod Tawde will on Sunday inaugurate the virtual classroom set up on the campus of the Shivaji University, Kolhapur (SUK).

SUK officials said an advanced virtual classroom has been developed at the Barrister Balasaheb Khardekar Library.

The classroom is equipped with a multimedia projector, visualizer, interactive board, and a digital podium.

"This ultra-modern classroom will be connected with 161 affiliated colleges through the National Knowledge Network. Students in these colleges can simultaneously witness the event using an Internet connection. This will be helpful for conducting various workshops and holding interactions online," said the official.



Lectures held under the Global Initiative of Academic Networks (GIAN) will also be webcasted through the virtual classroom, said the official. Developed under the Rashtriya Uchchatar Shiksha Abhiyan (RUSA), the virtual classroom will be helpful for distance learning, and spreading education in remote and rural places in the division.

Meanwhile, Fadnavis will be attending the ground breaking ceremony of the new building of the department of journalism and mass communication.

According to university officials, the department of mass communication and journalism will be completing 50 years in 2018, and it is an important academic department for the university and in Western Maharashtra.

Fadnavis will also be felicitating SUK authorities for their recent achievement in the National Institution Ranking Framework (NIRF), where the university was ranked 28th in the country in academics.

पुण्यनगरी    26 JUN 2016    जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात आज व्हर्च्युअल क्लासरूमचे उद्घाटन

## वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभाग, म्युझियम कॉम्प्लेक्सचेही होणार भूमिपूजन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते रविवार, २६ जून रोजी शिवाजी विद्यापीठ येथे व्हर्च्युअल क्लासरूमचे उद्घाटन तसेच वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभाग इमारतीचे भूमिपूजन करण्यात येणार आहे. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्या हस्ते विद्यापीठाच्या म्युझियम कॉम्प्लेक्सचे भूमिपूजन करण्यात येणार आहे. पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांची यावेळी प्रमुख उपस्थिती असेल. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली राजर्षी शाहू (सिनेट) सभागृहात हा कार्यक्रम होईल.

विद्यापीठात रविवारी दुपारी ३.४५ वाजता मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते व्हर्च्युअल क्लासरूमचे उद्घाटन करण्यात येईल. विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयात अत्याधुनिक अशी व्हर्च्युअल क्लासरूम साकारण्यात आली आहे. मल्टिमीडिया प्रोजेक्टर, व्हिज्युअलायझर, इंटरॅक्टिव्ह बोर्ड, डिजिटल पोडियम अशा आधुनिक सामग्रीसह ही क्लासरूम सुसज्ज आहे. याचबरोबर शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभागाच्या इमारतीचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात येणार आहे. सन २०१८ मध्ये सुवर्णमहोत्सवी वर्षात पदार्पण करणाऱ्या या अधिविभागाच्या दृष्टीने ही महत्त्वाची घटना आहे. कोल्हापूर, सांगली, सातारा या जिल्ह्यांतील आघाडीच्या वृत्तपत्रांत ८० टक्क्यांहून अधिक पत्रकार या विभागाचे विद्यार्थी आहेत..

म्युझियम कॉम्प्लेक्सच्या इमारतीचे भूमिपूजन उच्च व तंत्रशिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. सध्या कॅम्पसवर वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालयासह शाहू लोकजीवन वस्तू संग्रहालय तसेच इतिहास अधिविभागानेही संग्रहालय निर्मितीचे प्रयत्न चालविले आहेत. या तीनही संग्रहालयांचे एकत्रीकरण करून संग्रहालय संकुल विकसित करण्याची व त्याला संशोधनाची जोड देण्याची विद्यापीठाची भूमिका आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ 26 JUN 2016

# विद्यापीठात आज मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत विविध कार्यक्रम



कोल्हापूर, ता. २५ : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्या (ता. २६) शिवाजी विद्यापीठात विविध उपक्रमांचा प्रारंभ होत आहे. श्री. फडणवीस यांच्या हस्ते व्हर्च्युअल क्लासरूमचे उद्‌घाटन होत असून, वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभागाच्या इमारतीचे भूमिपूजन होईल. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री विनोद तावडे यांच्या हस्ते म्युझियम कॉम्प्लेक्सचे भूमिपूजन होणार आहे. पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती असेल. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली राजर्षी शाहू सभागृहात ३ वाजून ४५ मिनिटांनी कार्यक्रम सुरू होईल.

बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयात मल्टिमीडिया प्रोजेक्टर, व्हिज्युअलायझर, इंटरॅक्टिव्ह बोर्ड, डिजिटल पोडियम सामग्रीसह सुसज्ज व्हर्च्युअल क्लासरूम केली आहे. त्यामुळे नॅशनल नॉलेज नेटवर्कद्वारे जोडलेल्या संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षक, विद्यार्थ्यांशी संवाद साधणे, शैक्षणिक आदानप्रदान करणे शक्य होणार आहे. 'ग्यान' उपक्रमाअंतर्गत व्याख्यानमालांचा व्हर्च्युअल पद्धतीने विद्यार्थ्यांना लाभ देता येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी
26 JUN 2016

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज कोल्हापूर दौऱ्यावर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस रविवारी (दि.२६) कोल्हापूर दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या हस्ते विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासमवेत उच्च व तंत्र शिक्षणमंत्री विनोद तावडेही कोल्हापूर दौऱ्यावर येत आहेत.

रविवारी सकाळी १०.४५ वाजता मुख्यमंत्री फडणवीस यांचे कोल्हापूर विमानतळावर आगमन होईल. यानंतर शिरोली औद्योगिक वसाहत येथे शिरोली मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशनच्या (स्मॅक) वतीने आयोजित कार्यक्रमास ११.०५ वाजता ते उपस्थित राहणार आहेत. तेथून कागल येथे दुपारी १२.१० वाजता श्रीराम मंदिर लोकार्पण सोहळा त्यांच्या उपस्थित होणार असून १२.३० वाजता शाहू सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर शेतकरी मेळावा होणार आहे. दुपारी १.३० वाजता फडणवीस कसबा बावडा येथील राजर्षी शाहू जन्मस्थळाला भेट देणार आहेत. यानंतर ते १.४५ वाजता न्यू पॅलेस येथे पोहोचतील.

पान ९ वर ▶

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महाराष्ट्र टाईम्स 26 JUN 2016

# मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत आज भरगच्च कार्यक्रम

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**



राजर्षी शाहू छत्रपती यांच्या जयंती दिनाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज, (रविवार) कोल्हापुरात येत आहेत. त्यांच्या उपस्थितीत शेतकरी मेळावा, पुस्तक प्रकाशन, राजर्षी शाहू केंद्र म्युझियम कॉम्प्लेक्सचे भूमिपूजन असे कार्यक्रम होणार आहेत.

मुख्यमंत्री सकाळी साडेनऊ वाजता उजळाईवाडी विमानतळावर येतील. तेथून शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनच्या स्मॅक भवन, रामप्रताप झंवर सभागृह व कै. मोहनराव शिरगावकर हॉल उद्घाटन समारंभ, यानंतर कागल येथील राम मंदिराचा लोकार्पण सोहळा होणार आहे. सकाळी साडेअकरा वाजता शाहू साखर कारखान्याच्या कार्यस्थळावरील शेतकरी मेळाव्याला ते उपस्थित राहणार आहेत. शाहू कारखान्याचे अध्यक्ष समरजित घाटगे यांना भाजपमध्ये घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत, या पार्श्वभूमीवर हा दौरा आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समितीच्या राजर्षी शाहू गौरव ग्रंथाच्या तिसऱ्या सुधारित आवृत्तीचे प्रकाशन होणार आहे. दुपारी दोन वाजता केशवराव भोसले नाट्यगृहात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री विनोद तावडे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होणार आहे.

शिवाजी विद्यापीठात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते काही प्रकल्पांचे भूमीपूजन होणार आहे. दुपारी पावणेचार वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू संशोधन केंद्र म्युझियम कॉम्प्लेक्स, वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाच्या इमारतीचे भूमिपूजन तसेच व्हर्च्युअल क्लासरुमचे उद्घाटन होणार आहे.